रविवार, दि. २१ डिसेंबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ११७ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# अवैध गुटख्यावर पोलीसांची कारवाई ; ८५ लाखांचा मुद्देमाल जप्त

## जप्त केलेला प्रतिबंधित गुटखा कुणाचा ? प्रश्न कायम

**दीपक शेळके**

**जालना** - सदर बाजार हद्दीतील भोकरदन नाका परिसरातील सतिश जैस्वाल उर्फ लाला यांच्या देशी दारुच्या दुकानाजवळ तीन प्रतिबंधीत गुटख्याच्या गाड्या उभा असल्याची माहिती सदर बाजार पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षकांना दिल्यानंतरही त्यांनी कोणतीही कारवाई केली नसल्याने सदर बाजार पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांवर संशय निर्माण झाला होता. यासंदर्भात दैनिक युवा आदर्शने वृत्त प्रकाशित करत घडलेला प्रकार उघडकीस आणला होता. त्यानंतर जालना जिल्हा पोलिस अधीक्षक अजयकुमार बन्सल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी यांनी अवैध धंद्याविरोधात कठोर कारवाईचे आदेश दिले होते. त्यानुसार अपर पोलीस अधिक्षक व अंबड पोलीस आणि चंदनझिरा पोलीसांनी दोन वेगवेगळ्या घटनेत अवैध गुटख्यावर धडक कारवाई करत जवळपास ८५ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पोलीसांनी केलेल्या कारवाईबद्दल त्यांचे कौतूक होत आहे. मात्र, पोलीसांनी जप्त केलेला प्रतिबंधित गुटखा नेमका कुणाचा आहे हा प्रश्न कायम आहे. जो पर्यंत या गुटखा माफीयांच्या मुसक्या आवळल्या जाणार नाहीत तो पर्यंत अवैधरित्या गुटख्याची वाहतुक, साठा आणि विक्री ही होतच राहणार आहे. सदर बाजार पोलीसांच्या निष्क्रियेतेनंतर चंदनझिरा आणि अंबड पोलीसांनी केलेली कारवाई नक्कीच प्रशंसनीय आहे.

**अंबड पोलिस व अपर पोलीस अधीक्षक कार्यालयाची संयुक्त कारवाई; ७३ लाखांचा मुद्देमाल जप्त**

महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेल्या गुटख्याची अवैधरित्या वाहतूक करणाऱ्या कंटेनरवर जालना जिल्हा पोलिसांनी मोठी कारवाई करत तब्बल ७३ लाख ३० हजार २५० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई अंबड पोलिस स्टेशन व अपर पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या संयुक्त पथकाने केली.

**गुप्त माहितीवरून कारवाई** दिनांक १९ डिसेंबर २०२५ रोजी रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, प्रतिबंधित गुटखा घेऊन जाणारे वाहन जालना-बीड रोडने जात आहे. माहिती खात्रीशीर असल्याने तात्काळ कारवाईचे आदेश देण्यात आले.

**संशयित वाहनाचा पाठलाग** अपर पोलीस अधीक्षक कार्यालयातील व अंबड पोलिस स्टेशनचे अधिकारी-अंमलदार पथक घटनास्थळी रवाना झाले. रात्री अंदाजे २२.४५ वाजता संशयित कंटेनर वाहन क्रमांक MH 18 BZ 2350 हे जालना-बीड रोडवर इंडियन ऑईल पेट्रोल पंप ते हॉटेल भारत दरम्यान आढळून आले. पोलिसांनी वाहन थांबवून चालकास ताब्यात घेतले.

**चालकाची ओळख व झडती** वाहन चालकाने आपले नाव शिवम जादो देशमुख, रा. मुलताई, जिल्हा बैतूल, राज्य मध्यप्रदेश असे सांगितले. पंचासमक्ष वाहनाची झडती घेतली असता मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित गुटखा व तंबाखूजन्य पदार्थ आढळून आले. झडतीदरम्यान राजनिवास सुगंधित पान मसाला, विमल पान मसाला, रजनीगंधा, BABA-१२०, प्रिमियम जाफरानी जर्दा तंबाखू, किंमत : रु ४३,०८,२५०/- कंटेनर वाहन (जु.वा. किंमत) : रु ३०,००,०००, दोन मोबाईल फोन : रु २२,०००/-, एकूण मुद्देमाल : रु ७३,३०,२५०/- मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सदरचा सर्व मुद्देमाल पंचासमक्ष जप्त करण्यात आला असून आरोपीस कंटेनरसह ताब्यात घेऊन अंबड पोलीस स्टेशन येथे आणण्यात आले आहे. पुढील कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू आहे.

ही संपूर्ण कारवाई पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, सिद्धेश्वर धुमाळ उपविभागीय पोलीस अधिकारी, अंबड तसेच पोलीस निरीक्षक संतोष घोडके यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

पोलीस उपनिरीक्षक भागवत कदम, पोलीस उपनिरीक्षक ठुबे, पोहेकॉ यशवंत मुंडे, पोहेकॉ दिपक चव्हाण, पो.कॉ. अरुण मुंडे, निखिल गायकवाड, प्रताप सुंदर्डे, विशाल सोळुंके आदी अधिकारी व अंमलदारांनी ही धडाकेबाज कारवाई केली.

**चंदनझिरा पोलिसांकडून १२ लाखांचा मुद्देमाल जप्त; दोघे ताब्यात**

जालना शहरातील राजूर रोड परिसरात अवैधरीत्या विक्रीसाठी आणण्यात आलेल्या प्रतिबंधित गुटख्यावर चंदनझिरा पोलीस ठाण्याच्या पथकाने मोठी कारवाई करत गुटखा व चारचाकी वाहनासह सुमारे १२ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणात दोन संशयित आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. ही कारवाई आज शनिवार, दिनांक २० डिसेंबर २०२५ रोजी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास करण्यात आली.

**गोपनीय माहितीवरून छापा** चंदनझिरा पोलीस ठाण्याचे बाळासाहेब पवार यांनी अवैध धंद्यांविरोधात कारवाई करण्यासाठी स्वतंत्र पथक नेमण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार पोलिसांना गोपनीय माहिती मिळाली की, राजूर रोडवर एका चारचाकी वाहनातून जालना शहरात विक्रीसाठी मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित गुटखा आणण्यात येत आहे.

**वाहनासह गुटखा जप्त** मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिस पथकाने राजूर रोडवर सापळा रचून टाटा इंडिगो मंझा चारचाकी वाहन क्रमांक MH/02/BR/7497 थांबवले. पंचासमक्ष वाहनाची झडती घेतली असता त्यामध्ये विविध कंपनींचा प्रतिबंधित गुटखा आढळून आला.

यामध्ये मिराज, बाबा, रजनीगंधा, राजनिवास, सिग्नेचर, आरएमडी या कंपन्यांचा प्रतिबंधित गुटखा असून, त्याची अंदाजे किंमत १२ लाख रुपये आहे. गुटख्यासह संबंधित चारचाकी वाहनही जप्त करण्यात आले आहे.

**गुटखा वाहतुकीसाठी वाहनात बदल** कारवाईदरम्यान सदर वाहनामध्ये अधिक प्रमाणात गुटखा वाहतूक करता यावी यासाठी पाठीमागील सिट काढून टाकून विशेष रचना करण्यात आल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. यावरून आरोपी नियोजनबद्ध पद्धतीने अवैध गुटखा वाहतूक करत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

या कारवाईत खालील दोन संशयितांना ताब्यात घेण्यात आले आहे मोहम्मद तौसीफ अब्दुल रज्जाक (वय २३), रा. टट्टूपुरा, जालना, अब्दुल खालेद अब्दुल कादर (वय ५३), रा. बागवान मस्जिदजवळ, जुना जालना

या प्रकरणी पुढील कारवाईसाठी अन्न सुरक्षा अधिकारी, जालना यांना पत्र देण्यात आले असून संबंधित आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सदर कारवाई अजयकुमार बन्सल पोलीस अधीक्षक, जालना, आयुष नोपानी अपर पोलीस अधीक्षक, जालना तसेच अनंत कुलकर्णी उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक मनसुब वेताळ, पोहेकॉ कृष्णा तंगे, अभिजीत वायकोस, रविंद्र देशमुख, राजू पवार, पो.कॉ. सुनील पगार यांनी ही धडाकेबाज कारवाई केली.


### गुटखा माफियांना मोकळे रान आणि जनजागृतीचा ढोंगी देखावा

जालन्यात पोलीस प्रशासन नेमके कोणाच्या आरोग्याची काळजी घेत आहे?

**दीपक शेळके**

**जालना** - शहरात अवैधरित्या गुटखा विक्री करून युवकांच्या आरोग्याशी थेट खेळ करणारे सतीश जैस्वाल उर्फ 'लाला' याच्यावर कारवाई करण्याची संधी सदर बाजार पोलीस ठाण्याला चालून आली होती. मात्र, ही संधी वापरण्याऐवजी आरोग्य आणि झोप यांचा आधार घेत अवैध धंद्याला अप्रत्यक्ष अभय देण्यात आले, हे अत्यंत गंभीर आणि धक्कादायक वास्तव समोर आले आहे.

**माहिती मिळूनही कारवाई नाही ही निष्क्रियता की संगनमत?**

मंगळवार, दि. १६ रोजी रात्री ११.५० वाजता भोकरदन नाका परिसरात सतीश जैस्वाल उर्फ लाला याच्या देशी दारूच्या दुकानाजवळ गुटख्याने भरलेल्या तीन गाड्या उभ्या असल्याची अधिकृत माहिती सदर बाजार पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षकांना देण्यात आली होती. अशा वेळी कायद्याप्रमाणे तत्काळ रात्रीची कारवाई अपेक्षित असते.

मात्र, रात्रीच्या पथक सांगतो असे म्हणत कारवाईऐवजी झोपेला प्राधान्य देण्यात आले. दुसऱ्या दिवशी भेट घेतल्यानंतरही, दिवसा सांगा, मला माझे आरोग्य पाहायचे आहे. रात्री झोप महत्त्वाची आहे, असे उत्तर देणारे पोलीस निरीक्षक संदीप भारती यांचे हे विधान म्हणजे रात्री अवैध धंदे सुरू ठेवा, पोलीस फक्त दिवसा जागे असतात, असाच संदेश देणारे नाही का?

**५०-६० लाखांचा गुटखा, तरीही पोलीस हलले नाहीत!**

या घटनेदरम्यान संतोष भुतेकर, दीपक शेळके यांनी आयुष नोपाणी, पंकज जाधव यांच्यासह अनेक अधिकारी-कर्मचाऱ्यांना फोनद्वारे माहिती दिली. ५० ते ६० लाख रुपयांचा अवैध गुटखा असल्याचे स्पष्ट सांगूनही एकाही अधिकाऱ्याने प्रत्यक्ष घटनास्थळी जाण्याचे धाडस दाखवले नाही. हा प्रकार केवळ निष्काळजीपणा आहे का? की आर्थिक हितसंबंधांमुळे जाणीवपूर्वक डोळेझाक? हा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविकच आहे.

**माहिती मिळूनही कारवाई नाही ही निष्क्रियता की संगनमत?**

**रील्स स्पर्धा आणि दुटप्पी धोरण**

एकीकडे पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल अंमली पदार्थांविरोधात जनजागृतीसाठी रील्स स्पर्धा घेतात. मात्र त्या स्पर्धेत ड्रग्ज सेवन दाखवणाऱ्या रीलसला 'बेस्ट रील'चा पुरस्कार दिला जातो, ही बाब अधिकच चिंताजनक आहे.

ज्या रीलसमधून ड्रग्स घेऊ नका असा स्पष्ट संदेश नाही, अंमली पदार्थांविरोधी ठोस भूमिका नाही. अशी रील स्पर्धेत टिकते कशी? पुरस्कार मिळवते कसा? हे जनजागृती आहे की प्रसिद्धीसाठी केलेला केविलवाणा देखावा?

**ढोंग विरुद्ध वास्तव**

एका बाजूला व्यासपीठांवर भाषणे, रील्स स्पर्धा, युवकांचे भविष्य सुरक्षित करण्याच्या घोषणा आणि दुसऱ्या बाजूला रात्री उभ्या असलेल्या गुटख्याच्या गाड्या माहिती मिळूनही निष्क्रिय पोलीस गुटखा माफियांना मोकळे रान करून देतात. हा दुटप्पीपणा नाही तर काय?

**पोलीस अधीक्षकांनी स्वतः लक्ष घालावे**

जर सतीश जैस्वाल उर्फ लाला यासारख्या गुटखा माफियांवर ठोस कारवाई होत नसेल, तर कोणतीही जनजागृती, कोणतीही स्पर्धा, कोणतेही बक्षीस फक्त कागदी आणि दिखाऊ ठरेल.

आता प्रश्न स्पष्ट आहे सदर बाजार पोलीस ठाणे कोणासाठी काम करत आहे? युवकांच्या आरोग्यासाठी की गुटखा माफियांच्या फायद्यासाठी?

पोलीस अधीक्षकांनी या प्रकरणात स्वतः जातीने लक्ष घालून रात्री कारवाई न करणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करुन गुटखा माफियांवरील तात्काळ कठोर कारवाई केल्याशिवाय जालन्यातील युवकांचा विश्वास पोलीस प्रशासनावर बसणार नाही, हे वास्तव स्वीकारावेच लागेल.

सदर बाजार पोलीस ठाणे हद्दीत असलेल्या सतिश जैस्वाल उर्फ लाला यांच्या दारुच्या दुकान असलेल्या ईमारती वरच्या मजल्यावर त्याचे मोठे कार्यालय आहे. ईमारत सीसीटीव्हीने सज्ज आहे. या ईमारतीच्या व कार्यालयात येण्या जाण्याच्या मार्गावर असलेल्य सीसीटीव्हीची तपासणी पोलीस अधिकांकांनी करणे गरजेचे आहे. या ठिकाणी कोणते पोलीस अधिकारी अथवा कोणते दलाल मध्यस्थीसाठी येणे -जाणे करतात. ते दलाल नेमके कोणत्या क्षेत्राशी संबंधीत आहे. याचा सोक्षमोक्ष लागेल. कर्तव्यदक्ष पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करुन दोषींवर कारवाई करणार का हे पुढील काही दिवसांत स्पष्ट होईल.


### युवकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्यां लालासाठी सदर बाजार पोलीसांची 'आरोग्य' खेळी

सदर बाजार पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक म्हणताहेत दिवसभर काम; रात्री बारा वाजता सोडा

दीपक शेळके

जालना - शहरात अवैधरित्या गुटखा विक्री करत युवकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या सतीश जैस्वाल उर्फ लाला याच्या गुटख्याच्या गाड्यावर कारवाई करण्यासाठी सदर बाजार पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक आरोग्यांचे कारण देत आर्थिक हितसंबंधांची आरोग्य खेळी खेळत असल्याचे स्पष्ट होत आहे.

मंगळवार (दि १६) रोजी रात्री ११.५० मि. सदर बाजार पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक यांना सतीश जैस्वाल उर्फ लाला यांच्या सदर बाजार पोलीस ठाण्याच्या हद्दीतील भोकरदन नाका परिसरातील त्यांच्या देशी दारु विक्री केंद्राजवळ गुटख्याच्या तीन गाड्या असल्याची अधिकृत माहिती देण्यात आल्यानंतर त्यावर कारवाई करण्यासाठी रात्रीच्या पथकाला सांगण्यात येईल असे म्हणत सदर बाजार पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षकांनी झोपेला प्राधान्य दिले. संबंधीत व्यक्तीने सदर बाजार पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षकांना रात्री फोन करून अवैध गुटख्याची माहिती दिल्या नंतर त्यावर कारवाई होणे अपेक्षित असतांना कारवाई झाली नाही. त्यासंदर्भात दुसऱ्या दिवशी म्हणजेच बुधवार (दि १७) रोजी सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास पोलीस निरीक्षकांची या संदर्भात भेट घेतली असता त्यांनी त्यांच्याच आरोग्याचे कारण देत युवकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या लालासाठी खुली सुट दिल्याचे दिसून येत आहे. यासंदर्भात पोलीस निरिक्षक संदीप भारती यांची भेट घेतल्यानंतर त्यांनी स्पष्ट केले की, दिवसा कारवाई साठी सांगा, मला माझे आरोग्य पाहणे आहे. रात्रीला झोप घेणे महत्वाचे आहे. म्हणजे रात्रीच्यावेळी अवैध धंदे यांना सदर बाजार पोलीस ठाणे हद्दीत खुली सुट आहे असेच त्यांना म्हणायचे असेल ना?

पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल यांनी कालच अंमली पदार्थ व त्यासंबधीने रील स्पर्धा ठेवली होती. या स्पर्धेत एका तिकडीने ड्रग्ज सेवन करत त्याला प्रोत्साहन दिले. आणि त्याच तिकडीला पोलीस अधिक्षकांनी बेस्ट रिल्स घोषित केले. मुळात अंमली पदार्थापासून दूर ठेवणारी अथवा त्याला विरोध करणारी रील्सला पारितोषित मिळणावयास हवे असतांना ज्या तिकडीने अंमली पदार्थ सेवन केले. ती रिल्स योग्यरित्या पाहिल्यास त्यातून कोणताही योग्य संदेश म्हणजेच अंमली पदार्थाचे सेवन न करणे यासारखा मॅसेज मिळत नाही. असे असतांना ती रिल्स या स्पर्धेत टिकते कशी? आणि पारितोषिक घेते कशी? असा प्रश्न उपस्थित होतो आहे.

केवळ प्रसिद्धीच्या माध्यमातून युवकांना प्रेरित करण्याचा केविलवाणा प्रयत्न करायचा आणि दुसरीकडे सतीश उर्फ लाला यासारख्या गुटखा माफीयाला अभय द्यायचा हा दुटप्पी पणा पोलीस अधीक्षकांनी घ्यावा यापेक्षा दुसरे ढोंगी होणे नाही.

मुळात विषय आहे. मंगळवार (दि. १६) रात्री ११.५० नंतरचा यावेळी सतिश जैस्वाल उर्फ लाला यांच्या देशी दारुच्या दुकानाजवळ गुटख्याने भरलेल्या तीन गाड्या बेदिक्कत उभ्या होत्या. यासंदर्भात संतोष भुतेकर, दीपक शेळके यांनी आयुष नोपाणी, संदीप भारती, पंकज जाधव, धनाजी कावळे, कदम यासह विविध पोलीस अधिकारी कर्मचारी यांना फोनाफानी केली. यातील बहुतांशी फोन रिसिव्ह झाले काहींनी फोन रिसिव्ह केले नाहीत. फोनवर या अधिकाऱ्यांना सतीश उर्फ लाला यांच्या अवैध गुटख्याच्या जवळपास ५० ते ६० लाख्यांच्या गुटख्यासह तीन गाड्या उभ्या असल्याची माहिती दिली. मात्र, असे असतांना एकाही अधिकाऱ्यांने तत्परता दाखवत कारवाई करण्याचे धाडस दाखविले नाही. आता हे धाडस न दाखविण्यामागे नेमके कारण काय असावे हे न समजण्यासारखे मुळीच नाही. एकीकडे पोलीस अधिक्षक रील्स स्पर्धेतून जनजागृती करण्यासाठी प्रयत्नशील असतांना त्यांचेच अधिकारी गुटखा माफियांवर माहिती मिळाल्यानंतरही कारवाई करत नाहीत. या प्रकाराकडे पोलीस अधिक्षकांनी जातीने लक्ष घालण्याची आवश्यकता निर्माण झाली असून सतिश जैस्वाल उर्फ लाला यासारख्या गुटखा माफीयावर अंकुश लावल्याशिवाय पोलीस अधिक्षकांच्या कोणत्याही जनजागृतीचे फलीत होणार नाही हे मात्र तितकेच खरे आहे.






चंदनझिरा पोलीस ठाण्याच्या पथकाने मोठी कारवाई करत गुटखा व चारचाकी वाहनासह सुमारे १२ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पहिल्या छायाचित्रात तर दुसऱ्या छायाचित्रात अंबड पोलिस व अपर पोलीस अधीक्षक कार्यालयाची संयुक्त कारवाई करण्यात आली यात ७३ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. यावेळी उपस्थित पोलीस अधिकारी व कर्मचारी.

# शालिनीताई पाटील यांनी घेतला अखेरचा श्वास

**मुंबई** - ज्येष्ठ काँग्रेस नेत्या आणि राज्याचे दिवंगत माजी मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांच्या पत्नी शालिनीताई पाटील यांचं निधन झालं आहे. वृधापकाळाने त्यांच निधन झाल आहे. वयाच्या ९४ व्या वर्षी शालिनीताई पाटील यांनी अखेरचा श्वास घेतला आहे. गेल्या काही महिन्यांपासून त्या आजारी होत्या. त्या माहिममधे राहत होत्या. राहत्या घरीच त्यांचं निधन झालं आहे. साताऱ्यातील कोरेगाव तालुक्यातील मूळ गावी त्यांच्यावर अंत्यसंस्कार केले जाणार आहेत.



गेल्या काही दिवसांपासून शालिनीताई पाटील या आजारी होत्या. गेल्या काही दिवसांपासून शालिनीताई पाटील या आजारी होत्या. त्या मुंबईतील माहिन इथं राहत होत्या. तिथेच आज त्यांचं निध झालं आहे.त्यांच्यावर कोरेगाव तालुक्यातील मूळ गावी अंत्यसंस्कार केले जाणार आहेत. त्यांच्या निधनाने काँग्रेसवर शोककळा पोहोचली आहे. शालिनीताई यांनी वसंतदादांना खबीर साथ दिली होती. त्यांच्या निधनाने राजकीय, सामाजिक क्षेत्रातून दुखः व्यक्त केले जात आहे. शालिनीताई पाटील यांच्या निधनानंतर विविध स्तरातून शोक व्यक्त केला जात आहे. त्यांचा राजकीय प्रवास अत्यंत संघर्षाचा आणि चर्चेचा राहिला आहे. वसंतदादा पाटील यांच्याशी विवाह झाल्यानंतर त्या महाराष्ट्राच्या राजकारणात सक्रिय झाल्या. १९८० च्या दशकात त्यांनी काँग्रेस सरकारच्या काळात मंत्रिपद भूषवले होते. १९८१ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री ए. आर. अंतुले यांना राजीनामा देण्यास भाग पाडण्यात त्यांची भूमिका महत्त्वाची मानली जाते. त्यांनी सांगली लोकसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले होते, तसेच सातारा जिल्ह्यातील कोरेगाव विधानसभा मतदारसंघातून १९९९ ते २००९ या काळात त्या आमदार म्हणून निवडून आल्या होत्या. त्यापूर्वी १९९० मध्ये जनता दलातून आणि १९९५ मध्ये अपक्ष म्हणून त्यांनी निवडणूक लढवली होती, परंतु त्यात त्यांना यश आले नव्हते.

**शालिनीताई पाटील ह्यांच्या निधनाचं वृत्त दुःखद : शरद पवार**

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी शालिनीताई पाटील यांच्या निधनावर शोक व्यक्त केला आहे. राज्याच्या माजी कॅबिनेट मंत्री, माजी खासदार बॅरिस्टर शालिनीताई पाटील ह्यांच्या निधनाचं वृत्त दुःखद आहे. त्या आपली मतं मांडताना कधीही कचरत नसत. जितक्या जाहीरपणे त्या माझ्यावर टीका करत तितक्याच खुलेपणाने शरदचं नेतृत्व मान्य करा. हा वसंतदादांचा संदेश शालिनीताई निसंकोचपणे सहकाऱ्यांपर्यंत पोहचवत. एक स्पष्टवक्त्या, कायद्याच्या अभ्यासक, माजी मंत्री अशा बॅरिस्टर शालिनीताई पाटील ह्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

# भाजपच्या २०० इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती संपन्न

## उर्वरित मुलाखती आज - भाजपा जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे






**जालना । प्रतिनिधी** - जालना महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ करिता भारतीय जनता पार्टी जिल्हा जालना महानगर च्या वतीने इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती दि. २० डिसेंबर २०२५ शुक्रवार रोजी मुलाखती संपन्न झाल्या, या मुलाखती सुरू करण्यापूर्वी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते भारत मातेच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. मुलाखती दोन टप्प्यात असल्याने उर्वरित मुलाखती दि.२१ डिसेंबर २०२५ रोजी घेण्यात येणार आहे.

आज झालेल्या मुलाखती घेण्यासाठी माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे, माजी मंत्री आ. बबनराव लोणीकर, जालना ग्रा. जिल्हाध्यक्ष आ.नारायण कुचे, आ. संतोष पाटील दानवे, जालना महानगरपालिका निवडणूक प्रमुख माजी आ. कैलास गोरंटयाल, जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे, अशोक पांगारकर, सतीश जाधव, विजय कामड, विमलताई आगलावे, शुभांगीताई देशपांडे या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी इच्छुकांच्या मुलाखती दरम्यान माजी केंद्रीय राज्यमंत्री मा. रावसाहेब पाटील दानवे म्हणाले, भारतीय जनता पार्टी ही कार्यकर्त्यांवर विश्वास ठेवणारा पक्ष आहे. संघटनात्मक ताकद, सामाजिक कार्य, जनसंपर्क आणि पक्षनिष्ठा या निकषांवर उमेदवारांची निवड केली जाईल. सक्षम, अभ्यासू आणि लोकांशी जोडलेले उमेदवार मैदानात उतरवले जातील, असेही त्यांनी सांगितले.

त्याचबरोबर उर्वरित मुलाखती दि.२१ डिसेंबर २०२५ रोजी घेण्यात येणार आहे. निवडणूक लढविणाऱ्या इच्छुक उमेदवारांनी मुलाखतीस वेळेवर उपस्थित राहावे असे आवाहन भाजपा जालना महानगर जिल्ह्याच्या वतीने करण्यात येत आहे.

मुलाखत समिती: भाजपचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर आणि जिल्हा निवडणूक प्रमुख कैलास गोरंट्याल हे स्वतः इच्छुकांच्या मुलाखती घेत आहेत.

इच्छुकांचा प्रतिसाद: जालना नगरपालिकेचे महानगरपालिकेत रूपांतर झाल्यानंतर ही पहिलीच निवडणूक असल्याने इच्छुकांमध्ये मोठा उत्साह दिसत आहे. भाजपच्या कार्यालयात तब्बल ४५० ते ५०० अर्ज प्राप्त झाले असून कार्यकर्त्यांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे.

प्रत्येक प्रभागातून योग्य आणि निवडून येण्याची क्षमता असलेल्या पाच उमेदवारांची नावे प्रदेश स्तरावर पाठवण्यात येतील. अंतिम निर्णय: प्रदेश भाजप आणि पक्षश्रेष्ठी या पाच नावांपैकी अंतिम उमेदवाराची घोषणा करतील.

# संपादकीय पान

## गुन्ह्याचा नवा फंडा

पूर्वी दरोडेखोर घरांवर दरोडा टाकून घरातील मौल्यवान वस्तू आणि रोख रक्कम लुबाडून नेत असत पण आज काळ बदलला आजचे युग हे डिजिटल युग आहे आणि या डिजिटल युगात दरोड्याची पद्धतही बदलली. दरोडेखोरही डिजिटल झाले आणि दरोड्याची पद्धत डिजिटल झाली. आज दरोडेखोर तंत्रज्ञानाचा वापर करून लोकांची लुबाडणूक करतात त्यालाच सायबर गुन्हा असे म्हणतात. सायबर गुन्हेगार नागरिकांना तंत्रज्ञानाचा वापर करून नागरिकांना लुबाडण्याचा नवा नवा फंडा शोधत असतात कधी ते क्रेडिट कार्डची माहिती विचारून तर कधी बँक खात्याची माहिती विचारून अवघ्या काही सेकंदात नागरिकांचा बँक बॅलन्स शून्य करतात. जेंव्हा खात्यातून पैसे गायब होतात तेंव्हाच नागरिकांना आपली लुबाडणूक झाली हे लक्षात येते मात्र तोवर खूप उशीर झालेला असतो. सायबर गुन्हेगार फसवणूक झालेल्या नागरिकांचा बँक बॅलन्स शून्य करतात बरे हे सायबर गुन्हेगार शोधणे हे पोलिसांसाठीही मोठे जिकिरीचे काम असते कारण हे गुन्हेगार अदृश्य चेहऱ्याचे असतात. हे सायबर गुन्ह्याचे नवेनवे फंडे शोधून काढत असतात असाच ' डिजिटल अरेस्ट' हा नवा फंडा सायबर गुन्हेगारांनी शोधून काढला आहे. सध्या डिजिटल अरेस्टच्या नावे फसवणूक आणि लुटीचा सुळसुळाट सुरू आहे. डिजिटल अरेस्टद्वारे फसवणूक झाल्याचा प्रकार सध्या रोजच घडत आहे. यात सायबर गुन्हेगार जेष्ठ नागरिकांना लक्ष करतात आणि त्यांना डिजिटल अरेस्टची भीती घालून त्यांच्याकडून लाखोंची, करोडोंची लूट करतात. असाच प्रकार काही दिवसांपूर्वी पुण्यात घडला. डिजिटल अरेस्टची भीती दाखवून सायबर गुन्हेगारांनी ८३ वयाच्या निवृत्त सरकारी अधिकाऱ्याला तब्बल १ कोटी २० लाखांना गंडा घातला. याचा प्रचंड मानसिक त्रास झाल्याने त्या व्यक्तीचा मृत्यू झाला. याआधी हरियाणातही एका वृद्ध दांपत्याला अशाच प्रकारे डिजिटल अरेस्टची भीती दाखवून एक कोटी रुपयांना लुबाडले. डिजिटल अरेस्ट करताना सायबर गुन्हेगार श्रीमंत असणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना लक्ष करतात. सायबर गुन्हेगार जेष्ठ नागरिकांना व्हिडिओ कॉल करून आपण पोलिस, ईडी, सिआयडी, सीबीआय, प्राप्तिकर विभाग, लष्करी अधिकारी असल्याची बतावणी करतात. देशविघातक कृत्य, बेकायदेशीर वस्तू, ड्रग्स, बनावट पासपोर्ट, दहशतवाद्यांशी संबंध असल्याचे सांगून जेष्ठ नागरिकांना डिजिटल अरेस्ट केल्याचे संगीतात. पीडितांना विश्वास बसावा यासाठी ते न्यायालयाचे बनावट आदेशही पाठवतात. सायबर गुन्हेगार पीडित व्यक्तीला २४ तास त्यांच्या घरातच व्हिडिओ कॉलवर बंदिस्त अर्थात नजर कैदेत ठेवतात. सायबर गुन्हेगार व्हिडिओ कॉलवर कुठल्या तरी पोलिस स्टेशन किंवा सीबीआयच्या कार्यालयातून बोलत असल्याचे भासवतात. त्यामुळे पीडित व्यक्तीला त्यांच्यावर विश्वास बसतो. पीडित व्यक्ती आपण खरेच डिजिटल अरेस्ट झाल्याचे मानतो आणि तुरुंगात जावे लागू नये म्हणून सायबर गुन्हेगार मागतील तेवढी खंडणी त्याला देण्यास तयार होतात. सायबर गुन्हेगार ही खंडणी ऑनलाईन वसूल करतात. अवघ्या काही तासात सायबर गुन्हेगार या जेष्ठ नागरिकांकडून लाखो करोडो रुपये लुबाडतात. सायबर गुन्हेगारांनी डिजिटल अरेस्ट हा नवा फंडा वापरून यावर्षी जानेवारी ते ऑगस्ट या आठ महिन्यात तब्बल ११२ कोटी रुपये लुबाडल्याचे समोर आले आहे. या आठ महिन्यात डिजिटल अरेस्टचे तब्बल २०८ गुन्हे नोंदवले गेले आहेत. या आकडेवारी वरुनच याची व्याप्ती किती मोठी आहे हे आपल्या लक्षात येईल.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे ९९२२५४६२९५**

# मंदिरांच्या भूमीवरील सर्व प्रकारचे शुल्क रद्द करण्याची मंदिर महासंघाची मुख्यमंत्र्यांकडे मागणी; मुख्यमंत्री सकारात्मक!

**मुंबई -** महाराष्ट्र मंदिर महासंघाच्या वतीने राज्यातील सर्व मंदिरांच्या जमिनीवरील मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क व इतर कर पूर्णपणे माफ करण्याची तसेच मंदिरांच्या जमिनींचे संरक्षण करण्यासाठी 'अँन्टी लँड ग्रॅबिंग' कायदा तात्काळ लागू करण्याची मागणी आज महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यात आली. तसेच महाराष्ट्रातील सुमारे १० जिल्ह्यांतूनही विविध जिल्हाधिकारी, लोकप्रतिनिधी, पालकमंत्री आदींना या विषयीची निवेदने मंदिर महासंघाच्या वतीने मंदिर विश्वस्तांनी दिली आहेत. या वेळी महाराष्ट्र मंदिर महासंघाचे राष्ट्रीय संघटक श्री. सुनील घनवट आणि हिंदु जनजागृती समितीचे श्री. अभिजीत पोलके यांनी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. मुख्यमंत्री यांनी या दोन्ही मागण्यांचा सकारात्मक पद्धतीने विचार करून निवेदने पुढील कार्यवाहीसाठी संबंधित सचिवांकडे पाठविली आहेत. तसेच 'अँन्टी लँड ग्रॅबिंग कायद्याचा मसुदा तयार करण्याची प्रक्रिया शासनाने प्रारंभलेली असल्याची माहिती आहे.

या वेळी श्री. सुनील घनवट यांनी सांगितले, मंदिरे कोणताही व्यावसायिक हेतू न ठेवता सामाजिक, धार्मिक कार्य करीत असतात. अनेक श्रद्धाळू भक्त मंदिरांना जमिनी दान देतात. मंदिरांना समाजहिताच्या दृष्टीने आवश्यक गरजांकरिता जमीन खरेदी करावी लागते. अशा जमिनींच्या हस्तांतरणावर आकारले जाणारे सद्यस्थितील मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क, तसेच इतर शुल्क वा कर पूर्णपणे माफ करण्यात यावेत. यापूर्वी जमिनींच्या काही हस्तांतरण प्रकरणात अटी-शर्तींवर मुद्रांक शुल्कात अंशतः सूट देण्यात आलेली आहे; परंतु ती अत्यल्प आहे. त्यामुळे या मागणीचा सकारात्मक विचार करून महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम



व सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम नियम १९५० या संबंधित कायद्यांमध्ये आवश्यक त्या दुरुस्त्या करण्यात याव्यात.

# शिकत शिकत पुढे जाताना...

विद्यार्थी जीवन हा माणसाच्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाचा आणि सुंदर काळ असतो. या काळात मुलं शाळेत जातात, नवे ज्ञान मिळवतात, मित्र बनवतात, चांगल्या सवयी आत्मसात करतात आणि आयुष्यात पुढे जाण्यासाठी तयारी करतात. शिकत शिकत पुढे जाणे म्हणजे रोज काहीतरी नवीन शिकणे, स्वतःला सुधारत जाणे आणि आयुष्यात यशस्वी होण्यासाठी तयारी करणे होय. या प्रवासात यश आणि अपयश ही दोन्ही गोष्ट अनुभवायला मिळतात. दोन्ही अनुभव महत्त्वाचे आहेत कारण त्यातून आपल्याला खूप काही शिकायला मिळते. विद्यार्थी जीवनात यश म्हणजे केवळ परीक्षेत जास्त गुण मिळवणे नसते. यशाचे खरे स्वरूप म्हणजे प्रयत्न करणे, मेहनत करणे, शिस्त पाळणे आणि प्रत्येक गोष्ट लक्ष देऊन शिकणे. एखाद्या विद्यार्थ्याला आधी काही गोष्टी समजत नव्हत्या, पण प्रयत्नाने ते समजायला लागल्यास, हे खरे यश आहे. एखाद्या प्रश्नाचे उत्तर नीट सांगणे, एखादी गोष्ट लक्षात ठेवणे किंवा शिक्षकांची शाबासकी मिळणे ही सुद्धा यशाची उदाहरणे आहेत. यश मिळवण्यासाठी मेहनत फार महत्त्वाची आहे. नियमित अभ्यास, गृहपाठ पूर्ण करणे, नवीन गोष्टी शिकणे आणि शिक्षकांचे मार्गदर्शन ऐकणे यामुळेच विद्यार्थी यश मिळवतो. अभ्यास करताना लक्ष देणे, मन लावणे आणि वेळेचे नियोजन करणे खूप गरजेचे आहे. जो विद्यार्थी मेहनत करतो, तो हळूहळू प्रगती करतो. पण जो आळशी राहतो, त्याला अपयश येते. यश हे एक दिवसात मिळत नाही, त्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे गरजेचे असते. विद्यार्थी जीवनात खेळालाही महत्त्व आहे. खेळामुळे शरीर तंदुरुस्त राहते आणि मन आनंदी राहते. मैदानी खेळ, योग किंवा इतर व्यायाम यामुळे शरीर मजबूत होते. खेळताना नियम पाळणे, संयम ठेवणे, सहकार्य करणे आणि जिंकणे-हरणे यातून शिकायला मिळते. ही सवय पुढे आयुष्यात खूप उपयोगी ठरते. खेळामुळे विद्यार्थ्याला मनःशांती मिळते आणि तो शिकण्यासाठी तयार राहतो. शिकत शिकत पुढे जाताना अपयश येणेही सामान्य आहे. एखाद्या परीक्षेत कमी गुण मिळणे, काही प्रश्न सुटणे किंवा स्पर्धेत हरणे म्हणजे अपयश. अपयश आल्यावर विद्यार्थ्याला दुःख वाटते, राग येतो किंवा काही वेळा तो निराश होतो. पण अपयश म्हणजे संपले आहे असे नाही. अपयश आपल्याला शिकवते की आपण कुठे चुकलो, काय सुधारायला हवे आणि पुढे कसे करावे. अपयशातून आपण धैर्य, संयम आणि मेहनत करण्याची सवय शिकतो. अपयश आल्यावर हार मानू नये. पुन्हा प्रयत्न करणे खूप गरजेचे आहे. ज्या विद्यार्थ्याने अपयशातून शिकून प्रयत्न सुरू ठेवले, तो नक्कीच यशस्वी होतो. एखादा विद्यार्थी सुरुवातीला कमी गुण मिळवतो, पण पुढे प्रयत्न करून चांगले गुण मिळवतो, तर तो खऱ्या अर्थाने शिकत शिकत पुढे जातो. म्हणून अपयशाची भीती नको वाटावी ते फक्त आपल्याला सुधारण्याची संधी देते. विद्यार्थी जीवनात वेळेचे महत्त्व फार आहे. वेळेचा योग्य उपयोग केला तर अभ्यास, खेळ आणि इतर उपक्रम नीट करता येतात. वेळ वाया घालवला तर अभ्यास मागे पडतो आणि यश मिळणे कठीण होते. वेळेवर उठणे, वेळेवर अभ्यास करणे, वेळेवर खेळ करणे आणि वेळेवर झोपणे ही चांगली सवय लावल्यास विद्यार्थी नेहमी पुढे जातो. वेळेचे नियोजन करणारा विद्यार्थी यश मिळवतो. मित्रांचाही विद्यार्थ्याच्या शिकण्यावर मोठा परिणाम होतो. चांगले मित्र आपल्याला अभ्यासात मदत करतात, योग्य सवयी शिकवतात आणि अडचणीच्या वेळी सोबत राहतात. वाईट सवयी असलेल्या मित्रांपासून दूर राहणे फार गरजेचे आहे. चांगली संगत असेल तर विद्यार्थी शिकायला आणि प्रगती करायला प्रेरित होतो. आई-वडील आणि शिक्षक हे विद्यार्थ्याचे खरे मार्गदर्शक असतात. ते आपल्याला योग्य दिशा दाखवतात, चुका सुधारायला सांगतात आणि प्रयत्न करण्यास प्रोत्साहित करतात. त्यांच्या सल्ल्याचे पालन केल्यास विद्यार्थी योग्य मार्गाने चालतो. त्यामुळे शिक्षकांचे आणि आई-वडीलांचे मार्गदर्शन ऐकणे आवश्यक आहे. शिकत शिकत पुढे जाताना विद्यार्थी केवळ अभ्यास शिकत नाही, तर आयुष्यातील चांगल्या सवयी, नियम पाळणे, संयम ठेवणे, वेळेचे महत्त्व समजून घेणे आणि चांगल्या मित्रांची निवड करणे हे सुद्धा शिकतो. या सवयी आयुष्यभर उपयोगी पडतात. सकारात्मक विचार ठेवणे, मी करू शकतो असा आत्मविश्वास ठेवणे, हा गुण यश मिळवण्यासाठी खूप महत्वाचा आहे. विद्यार्थी जीवनात मिळणारे अनुभव, शिकवण आणि प्रयत्न हे सर्व जीवनभर आपल्याला साथ देतात. मेहनत, शिस्त, धैर्य, मित्रत्व, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि योग्य सवयी या सर्वांमुळे विद्यार्थी चांगला माणूस आणि यशस्वी नागरिक बनतो. शिकत शिकत पुढे जाण्याचा प्रवास म्हणजे रोज काहीतरी नवीन शिकणे, प्रयत्न करणे, अपयशातून शिकणे आणि हळूहळू प्रगती करणे. हा प्रवास कधीच थांबत नाही. यश मिळवण्यासाठी सतत प्रयत्न करणे, मेहनत करणे आणि चांगल्या सवयी लावणे खूप महत्त्वाचे आहे. जो विद्यार्थी शिकत शिकत पुढे जातो, तो नक्कीच आयुष्यात यशस्वी होतो.



**विठ्ठल जयवंतराव अनमुलवाड**
**परभणी ९०९६०७५६३०**

# शालेय राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेसाठी पंच म्हणून नियुक्ती

**जालना । प्रतिनिधी -** क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे. व शालेय भारतीय खेळ महासंघ अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय अहिल्यानगर, जिल्हा क्रीडा परिषद अहिल्यानगर, द्वारा ६९ वी शालेय राष्ट्रीय कबड्डी स्पर्धा (१७ वर्षे मुली) २०२५ २६ चे आयोजन दिनांक २४ ते २८ डिसेंबर २०२५ या कालावधीत आत्मा मालिक शैक्षणिक व क्रीडा व संकुल, कोकमठाण येथे स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे या स्पर्धेसाठी जिजामाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय किनगाव तालुका अंबड जिल्हा जालना येथे कार्यरत असलेले राष्ट्रीय कबड्डी पंच व प्रशिक्षक संजय येळवंते यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे त्यांनी यापूर्वी अनेक राज्य, राष्ट्रीय, व अखिल भारतीय कबड्डी स्पर्धेमध्ये पंच म्हणून उल्लेखनीय कार्य केलेले आहे या नियुक्ती बद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माननीय बाबासाहेब इंगळे प्राचार्य कैलास मुके जालना जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या अध्यक्षा माधवी काळे प्राध्यापक सोपानराव तेलगड सचिव प्रशांत तेलगड महेश खर्डेकर भुजंग डावकर डॉक्टर प्रशांत राष्ट्रीय कबड्डी सुवर्णपदक विजेता खेळाडू व राष्ट्रीय प्रशिक्षक रवींद्र ढगे बाबासाहेब मंडळे सुंदर थोरात संतोष नागवे प्राचार्य निलेश गायकवाड बी जे पाटोळे दिनेश वाघ विठ्ठल दिवटे शिवम जाधव माधव चव्हाण अजय काळवणे हरी वाडेकर प्रदीप राठोड देविदास भोजने राष्ट्रीय खेळाडू रोहित बिन्नी वाले आकाश दिवटे यांनी अभिनंदन करून स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या



# गुंतवणूक काढली

मुंबई - भारतीय शेअर बाजारातून २०२५ मध्ये विदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांनी मोठ्या प्रमाणात रक्कम काढून घेतली आहे. जानेवारीपासून सुरु असलेला ट्रेंड डिसेंबरमध्ये देखील कायम आहे. विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी डिसेंबर महिन्यात २२ हजार कोटी रुपयांहून अधिक रकमेच्या शेअर्सची विक्री केली आहे. विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी भारतीय शेअर बाजारातून वित्तीय, माहिती तंत्रज्ञान, सेवा, आरोग्य, ऊर्जा, एफएमसीजी आणि कॅपिटल गुडस् सारख्या महत्त्वाच्या क्षेत्रातील शेअर्सची विक्री करत त्यांची गुंतवणूक काढून घेतली. डिसेंबर महिन्यात सर्वाधिक विक्रीचा दबाव वित्तीय सेवांवर दिसून आला. या क्षेत्रात विदेशी संस्थांत्मक गुंतवणूकदारांनी डिसेंबरच्या पहिल्या दोन आठवड्यात ६५१६ कोटी रुपयांहून अधिक शेअर्सची विक्री केली.

# जगाच्या सार्वत्रिक विकासात महीलांची भूमिका महत्त्वाची - डॉ. देशमुख

**विशाल देशमुख**
**जाफराबाद -** येथिल, सिद्धार्थ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय जाफराबाद व राष्ट्रीय सेवा योजना विभाग तसेच महीला विकास कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने मौजे हारपाळ येथिल जि.प.प्रशाला जाफराबाद . जि. जालना. येथे आज दिनांक २० डिसेंबर रोजी सकाळी ११.00 वाजता महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोप प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. आर .टी .देशमुख यांनी महीला मेळाव्यात आपले विचार व्यक्त करतांना महीला धार्मिक, औद्योगिक, सांस्कृतिक व राजकीय इत्यादी क्षेत्रांत आपले मौलिक योगदान देत आहेत .या साठी मध्ययुगीन कालखंडापासून ते आजपर्यंत महीलांच्या योगदानाचा सोदाहरण आढावा घेतला.

कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या श्रीमती प्रा.डॉ. सुनंदा सोनुने यांनी महिलांना आरोग्य, शिक्षण, स्वावलंबन, कुटुंबातील भूमिका व सामाजिक जबाबदाऱ्या याबाबत सखोल व प्रेरणादायी मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे उपस्थित महिलांमध्ये नवं चैतन्य निर्माण झाले.




या कार्यक्रमास मौजे हारपाळ येथिल गावचे प्रथम नागरिक लोखंडे आर. यु.,उप सरपंच जाधव ज्ञानेश्वर, मुख्याध्यापिका श्रीमती शिवणीकर एस. एल., श्री पाटील पी.जी, फुकट जी. आर, श्रीमती लहाने एल. बी., श्रीमती वाकोडे डी. के., तसेच हारपाळा येथिल, श्रीमती ममता जाधव, श्रीमती सुनीता खडके, श्रीमती ईंदुबाई जाधव, श्रीमती पूजा जाधव व गावातील बहुसंख्य महीला उपस्थित होत्या. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. शिवाजी जगतवाड, डॉ. प्रद्रीप मिसाळ, श्रीमती सरीता मणियार, तसेच महीला विकास कक्षाच्या डॉ. सारीका जाधव, श्रीमती प्रा. निर्मला खांडेभराड व महाविद्यालयातील प्रसिद्ध प्रमुख प्रा. अनिल वैद्य यांनी मोलाचे सहकार्य केले. या कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

## बेळगाव जिल्हाधिकाऱ्यांविरोधात हक्कभंगाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी

**बेळगाव :** खासदार धैर्यशील माने यांना बेळगाव जिल्ह्याच्या सीमेवर अडवणे बेळगावचे जिल्हाधिकारी मोहम्मद रोशन यांना महागात पडण्याची चिन्हं आहेत. जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या अधिकाराचा गैरवापर करून आपल्याला बेळगाव जिल्ह्यात प्रवेश नाकारल्याचा आरोप खासदार धैर्यशील माने यांनी केला. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांच्या विरोधात हक्कभंगाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी खासदार धैर्यशील माने यांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्याकडे केली. धैर्यशील माने यांनी बिर्ला यांना त्यासंबंधी सविस्तर पत्र पाठवून न्यायाची मागणी केली आहे. १ नोव्हेंबर २०२५ रोजी, सीमावादासंदर्भातील कायदेविषयक तज्ज्ञ समितीचे अध्यक्ष या नात्याने खासदार धैर्यशील माने बेळगावकडे रवाना झाले होते. मात्र, जिल्हाधिकारी मोहम्मद रोशन यांनी कथितरीत्या बेकायदेशीर नोटीस जारी करून पोलिसांच्या माध्यमातून सीमा भागात प्रवेश करण्यापासून अडवले, असा आरोप खासदार माने यांनी केला आहे.

# १०० शिक्षक क्लब च्या गडकिल्ल्यांवर आधारित स्पर्धेत जेबीकेचे तीन विद्यार्थी



**विशाल देशमुख**
**टेंभूर्णी -** १०० शिक्षक क्लब जालना द्वारा आयोजित बारा गड किल्ल्यांच्या वर आधारित सामान्य ज्ञान स्पर्धेत टेंभुर्णी येथील श्रीमती जे बी के विद्यालयाचे तीन विद्यार्थी चमकले. या विद्यार्थ्यांना नुकतेच बक्षीस वितरण करण्यात आले आहे. या विद्यार्थ्याचे अभिनंदन होत आहे. त्या विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे कुमारी माधवी मनोहर चव्हाण, सोहेल कौसर शेख, धनश्री सुरेश राऊत. या विद्यार्थ्यांना दिनांक २० डिसेंबर रोजी झालेल्या कार्यक्रमांमध्ये बक्षीस वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विचारवंत प्राध्यापक एस जी जोशी सर हे होते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध बाल साहित्यिक तथा वरिष्ठ अधिव्याख्याता छत्रपती संभाजीनगर डॉक्टर विशाल तायडे, हे होते या कार्यक्रमास विशेष उपस्थिती, शंभर शिक्षक क्लबचे राजेभाऊ मगर, डॉक्टर श्रीहरी दराडे, विनोद वीर, बाबासाहेब अबुज, सुभाष भालेराव अनिल पवार, संजय कायंदे, गजानन वाळके, आदींची उपस्थिती होती. या कार्यक्रमास शाळेतील क्रीडाशिक्षक राजेश शेवाळे यांची आवर्जून उपस्थिती होती. या कार्यक्रमास जिल्ह्यातील विद्यार्थी शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या कथित कृत्यावर FIR करून निष्पक्ष चौकशीची SDPI ची मागणी

# महिलांच्या सन्मानावर आणि संविधानिक मूल्यांवर हल्ला सहन केला जाणार नाही

**जालना । प्रतिनिधी -** सोशल डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया (SDPI) जालना यांच्यावतीने हे स्पष्टपणे सांगण्यात येते की बिहारचे मुख्यमंत्री श्री. नितीश कुमार यांनी एका महिलेसोबत कथितपणे केलेले अमर्यादित, आक्षेपार्ह आणि असंवैधानिक वर्तन अत्यंत गंभीर व निंदनीय आहे.

विविध वृत्तवाहिन्या तसेच सोशल मीडियावर प्रसारित झालेल्या व्हिडिओ व दृश्यांवरून असे दिसून येते की सार्वजनिक मंचावर संबंधित महिलेच्या संमतीशिवाय शारीरिक हस्तक्षेप करण्यात आला, ज्यामुळे महिलेच्या सन्मान व प्रतिष्ठेला धक्का पोहोचला आहे. यामुळे समाजात महिलांच्या सुरक्षिततेबाबत चुकीचा संदेश जात आहे. तसेच धार्मिक प्रतीक व भावनांच्या पवित्रतेचा अवमान झाल्याचा आरोपही अतिशय चिंताजनक आहे.

SDPI चे ठाम मत आहे की महिलांचा सन्मान, गोपनीयता आणि प्रतिष्ठा हे भारतीय संविधानाने दिलेले मूलभूत अधिकार आहेत, आणि कोणतीही व्यक्ती - कितीही मोठ्या पदावर असली तरी - कायद्यापेक्षा मोठी नाही. भारतीय न्याय संहिता (BNS) २०२३ मध्ये महिलांची लज्जा भंग करणे, लैंगिक छळ, संमतीशिवाय शारीरिक संपर्क तसेच धार्मिक भावना दुखावणे यासंबंधी कठोर तरतुदी स्पष्टपणे नमूद आहेत.

या पार्श्वभूमीवर SDPI जालना यांच्या वतीने संबंधित पोलीस ठाण्यात अधिकृत तक्रार दाखल करून मागण्या करण्यात आल्या आहेत,

या संपूर्ण प्रकरणात प्राथमिकी (FIR) नोंदविण्यात यावी

प्रकरणाची निष्पक्ष, स्वतंत्र व पारदर्शक चौकशी करण्यात यावी,दोषी आढळल्यास कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात यावी अशा मागण्या करण्यात आल्या.




SDPI हे स्पष्ट करते की हा विषय कोणत्याही प्रकारच्या राजकीय द्वेषातून उभा करण्यात आलेला नसून, महिलांचा सन्मान, संविधानिक मूल्ये आणि कायद्याचे राज्य यांच्याशी संबंधित आहे. आज अशा प्रकरणांकडे दुर्लक्ष केल्यास उद्या त्याचे गंभीर परिणाम समाजाला भोगावे लागतील. तक्रार सादर करतांना, समी कौसर, मलीहा फातेमा, ज़िला उपाध्यक्ष असदुल्ला रजवी, ज़िला उपाध्यक्ष इरफान खान, विधानसभा अध्यक्ष शेख सईद, शेख साजिद, मोबीन खान, उज़ेफ खान, शेख वसीम, मौलाना मुजाहिद, शेख सोबान, शेख अकरम, उपस्थित होते.

# जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यात दि.२५ डिसेंबर रोजी ख्रिसमस, ३१ डिसेंबर वर्षाचा शेवटचा दिवस आणि १ जानेवारी नुतन वर्ष स्वागत व भिमा कोरेगाव शौर्य दिवस या सण, उत्सव आणि आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता राखण्यासाठी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) (३) अन्वये जालना जिल्ह्याच्या संपूर्ण हद्दीत दि.१ जानेवारी २०२६ पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी करण्यात आली आहे, असे आदेश अपर जिल्हादंडाधिकारी गणेश महाडिक यांनी जारी केले आहेत.

संपूर्ण जालना जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश दि. १८ डिसेंबर रोजी सकाळी ६ वाजेपासून ते दि. १ जानेवारी २०२६ रोजीच्या २४ वाजेपर्यंत लागू राहील. या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत बाळगता येणार नाही. व्यक्तीचे प्रेते, आकृत्या व प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. जाहीरपणे घोषणा, गाणे म्हणणे, वाद्य वाजविणे यास प्रतिबंध राहील. तसेच कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास किंवा मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश अधिकारी- कर्मचाऱ्यांना तसेच उपविभागातील पोलिस अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूका, सभा, मोर्चा यांना लागू राहणार नाही, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# जालन्यामधील वायू प्रदूषण कमी करण्यासाठी तातडीने उपाययोजना करा - पर्यावरण मंत्री मुंडे

## प्रदुषण नियंत्रण उपाययोजनांचा आढावा बैठक संपन्न



**मुंबई । प्रतिनिधी -** जालना व छत्रपती संभाजीनगरमधील प्रदूषण कमी करण्यासंदर्भात पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी आढावा घेतला. जालनामधील हवा प्रदुषणासंदर्भात चिंता व्यक्त करून प्रदूषण कमी करण्यासाठी योग्य ती पावले उचलावीत. तसेच उच्चस्तरीय अधिकाऱ्यांनी बैठक घेऊन प्रदूषण करणाऱ्या उद्योगांविरुद्ध तातडीने कारवाई करण्याच्या सूचना पर्यावरण मंत्री मुंडे यांनी यावेळी दिल्या.

जालना औद्योगिक वसाहत तसेच छत्रपती संभाजीनगरमधील वाळुंज, शेंद्रा, ऑरिक सिटी औद्योगिक वसाहतींमधील वायू व जल प्रदूषणासंदर्भात आज पर्यावरण मंत्री मुंडे यांनी मंत्रालयात बैठक घेतली. यावेळी विभागाच्या सचिव जयश्री भोज, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव एम. देवेंदर सिंग, सहसंचालक (हवा प्रदूषण) सतीश पडवळ यांच्यासह दोन्ही जिल्ह्यातील प्रादेशिक अधिकारी, औद्योगिक विकास महामंडळाचे व जिल्हा प्रशासनातील अधिकारी दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

जालना औद्योगिक वसाहतीमध्ये स्टील उद्योगामुळे हवेत धुलीकणांमुळे प्रदूषण होत आहे. यासंबंधीच्या अनेक तक्रारी आल्या आहेत. या धुलिकणांमुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत असून त्यावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे धुलीकणांवर नियंत्रणासाठी संबंधित कंपन्यांनी प्राथमिक हवा प्रदूषण नियंत्रण संयत्रणांमध्ये सुधारणा करून घेण्यासंबंधी त्यांना कळविण्यात यावे. जे अशी यंत्रणा उभारणार नाहीत त्यांच्याविरुद्ध कडक कारवाई करण्याचे निर्देश पर्यावरण मंत्री मुंडे यांनी यावेळी दिले.

छत्रपती संभाजीनगरमधील वाळुंज औद्योगिक वसाहतीमध्ये जल प्रदूषण रोखण्यासाठी सांडपाणी प्रक्रिया युनिट कार्यरत आहे. येथील सांडपाण्यावर १०० टक्के पुनर्वापरासाठी परवानगी देण्यात आली आहे. त्यामुळे येथे प्रक्रिया केलेले पाणी खाम नदीत न सोडता त्याचा पुनर्वापर होण्यासाठी योग्य खबरदारी घेण्यात यावी, असे निर्देश मंत्री मुंडे यांनी दिल्या.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सिंग यांनी जालना व वाळुंज येथील प्रदूषणासंबंधीची माहिती देऊन प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या वतीने करण्यात येत असलेल्या कार्यवाहीबाबत माहिती दिली. जालना औद्योगिक वसाहतीमध्ये हवा प्रदूषणाची पातळी तपासण्यासाठी फिरत्या वाहनाद्वारे वायू गुणवत्ता निरीक्षण केले जात आहे. तसेच वाळुंज औद्योगिक वसाहतीमध्ये सांडपाणी प्रकल्पामध्ये प्रक्रिया केलेले सांडपाणी न पाठविणाऱ्या ५३ उद्योगांना निर्देश देण्यात आले असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.








**रोडवर साचलेला कचरा व कचरा घेऊन जाणाऱ्या इलेक्ट्रॉनिक गाड्या पेट्रोल गाड्या डिझेल गाड्या या बऱ्याच दिवसांनी बंद पडलेल्या असून याकडे शहर महानगरपालिकेने लक्ष देण्याची गरज. (छायाचित्र किरण खानापुरे)**

# पार्थ सैनिकी शाळेचे वार्षिक स्नेह संमेलन उत्साहात







**जालना । प्रतिनिधी -** येथील पार्थ सैनिकी शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाचे २२ वे वार्षिक स्नेह संमेलनात विद्यार्थ्यांनी विविध कलाविष्कार सादर करत उपस्थितांची मने जिंकली. खरपुडी येथे शिस्त, शौर्य आणि देश प्रेम ाच्या भावनेतून रुजत असलेल्या संस्काराचे दर्शन घडल्याने संपूर्ण परिसर भारावून गेला. शाळेतील एकूण ४७६ पैकी तब्बल ४३० विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या कला प्रकारात सहभागी होवून अद्भूत दाद मिळविली.

या वार्षिक स्नेह संमेलनास प्रमुख पाहुणे म्हणून पुणे येथील शिव जागर अभियानचे मुख्य प्रवर्तक आणि राष्ट्रीय किर्तनकार प्रो. डॉ. गजानन महाराज वाव्हळ हे होते. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आरोग्यमंत्री तथा मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राजेश टोपे हे उपस्थित होते. व्यासपीठावर संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. बी. आर. गायकवाड, डॉ. भागवत कटारे, प्राचार्य राहुल भालेकर, प्रशासक मोहन नेहेरे, डॉ. कैलास राजगुरु यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीप प्रज्वलन आणि सरस्वती तसेच स्व. अंकुशरावजी टोपे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन स्नेह संमेलनाचे उद्घाटन झाले.

यावेळी प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. गजानन महाराज वाव्हळ यांनी विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराज, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भगतसिंग, सुखदेव, राजगुरु या महापुरुषांचा आदर्श घेवून वाटचाल करण्याचे आवाहन केले. ज्या प्रमाणे शाळेत शिक्षण दिले जाते, त्याचप्रमाणे घरातही पालकांनी संस्कारक्षम वातावरण तयार करावे. विद्यार्थी घडवण्यासाठी पालक व शिक्षक या दोघांचीही महत्त्वाची जबाबदारी आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

प्रारंभी शाळेचे प्राचार्य राहुल भालेकर यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात शाळेच्या आजपर्यंतच्या वाटचालीची माहिती दिली. निवासी शाळेत शिस्त, गुणवत्ता राखताना विद्यार्थ्यांच्या अभ्यासाकडे आणि त्यांच्या आरोग्याकडे वैयक्तिक लक्ष दिल्या जाते, असे त्यांनी सांगितले.

संस्थेचे अध्यक्ष राजेश टोपे यांनी अध्यक्षीय समारोप केला. ते म्हणाले, पार्थ सैनिकी शाळेतील विद्यार्थी शिस्तप्रिय असून, उद्दिष्टानुसार भविष्यात हे विद्यार्थी उच्चपदावर पोहोचणार आहेत. त्या दृष्टीने शाळेची संपूर्ण टीम प्रयत्न करत असते. निवासी शाळा असल्याने येथे वेळापत्रकानुसार शिस्तबध्द पध्दतीने काम चालते. दिनचर्यानुसार विद्यार्थ्यांना वागावे लागते. ही शिस्तच विद्यार्थ्यांना उच्च शिखरावर पोहोचवणार आहे. विद्यार्थ्यांचा अभ्यास, खेळ, व्यायाम, आरोग्य आणि विविध कलागुणांकडे वैयक्तिक लक्ष दिले जाते. कडक शिस्त आणि कठोर परिश्रमातून सगळ्यांचा केंद्रबिंदू असलेल्या या विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करून एक आदर्श नागरिक घडविण्यासाठी प्रयत्न केले जातात. त्यासाठी पालकांनीही सहकार्य करावे, असे राजेश टोपे यांनी सांगितले.

प्रारंभी शाळेच्या परेड ग्राऊंडवर विद्यार्थ्यांच्यावतीने प्रमुख पाहुण्यांना मानवंदना देण्यात आली. यावेळी कॅडेट परेड, मल्लखांबाची चित्तथरारक प्रात्यक्षिके, कराटे प्रात्यक्षिके आणि सांस्कृतिक कार्यक्रम ातील विद्यार्थ्यांच्या कलागुणांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. यावेळी बॅण्ड पथक, देश भक्ती गीते आणि विद्यार्थ्यांच्या शिस्तबध्द कलागुणांच्या आविष्काराने संपूर्ण परिसर भारावून गेला होता.

या संमेलनासाठी शाळेच्या सर्व पालकांना तसेच पत्रकारांना आमंत्रित करण्यात आले होते. त्यानुसार पंचक्रोशीतील नागरिकांनी उपस्थित राहुन विद्यार्थ्यांचा उत्साह व्दिगुणीत केला. या संमेलनाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रम ाचे सुत्रसंचालन भगवान पडूळ, सतिश गाभूड, अनिल दहातोंडे, डॉ. गणेश चांदर यांनी केले. शेवटी शाळेचे उपप्राचार्य अंकुश खराबे यांनी आभार मानले.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.